दाखल दिनांक -२१/०९/२०११.
नोंदणी दिनांक - २१/०९/२०११.
निकाल दिनांक -२८/१०/२०१३.
कालावधी - २ वर्ष,१म.७दि.
निशाणी क. - ३२.

**सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालय, चिखली.**
**(शे.रा.तोतला यांचे समक्ष)**

**नियमित दिवाणी दावा क.१३८/२०११.**

सौ.कुसुमबाई देवलाल खरे,
वय ४० वर्ष, धंदा - शेती,
रा.भालगांव, ता.चिखली,
जि. बुलडाणा. .....वादी.

-विरुध्द-

१. श्रीमती सुंदराबाई धनसिंग मांडवे,
वय ७० वर्ष, धंदा- शेती,

२. चिंधालाल धनसिंग मांडवे,
वय ३५ वर्ष, धंदा- शेती,
दोघे रा. धोडप, ता.चिखली,
जि. बुलडाणा. .....प्रतिवादी.

**दावाः- सरस-निरसवाटणी होउन स्वतंत्र ताबा मिळण्याकरीता.**

श्री.आर.डब्ल्यू.बडगे, वकील, वादीकरीता.

प्रतिवादीं करीता एकतर्फी.

**न्या य नि वा डा**

( दिनांक २८ ऑक्टोबर २०१३ )

१. प्रस्तुतचा दावा वाद मिळकतीची सरस-निरस वाटणी

होउन ताबा मिळण्याकरीता केला आहे.

२. मौजे धोडप ता.चिखली येथील गट क.१९८, क्षेत्रफळ ४ हेक्टर १० आर, परिच्छेद क.१ मध्ये विर्निदिष्टपणे नमुद केलेली मिळकत, (यानंतर याचा उल्लेख 'वाद मिळकत' असा करण्यात येत आहे) हा दाव्याचा विषय आहे.

३. वादीच्या कथनानुसार हकीकत आहे ती पुढीलप्रमाणेः-

प्रतिवादी क.१ सुंदराबाई व प्रतिवादी क.२ चिंधालाल हे वादी कुसुमबाईचे अनुकमे सावत्र आई व सावत्र भाउ आहेत. वादीचे वडील धनसिंग शामजी मांडवे हे दिनांक २३/१२/२०१० रोजी मरण पावले. वाद मिळकत त्यांची कष्टार्जित मिळकत होती. सबब वारसा हक्का नुसार वादीचा वाद मिळकतीत १/३ हिस्सा आहे. तिचा हिस्सा वारंवार मागणी करुनही प्रतिवादींनी तिला वेगळा करुन दिला नाही. करीता तिने सदरचा दावा दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क.१ ला निशाणी ६ नुसार दावा समन्सची बजावणी करण्यात आली. तसेच प्रतिवादी क.२ ला दिवाणी प्र. संहितेचे आदेश ५ नियम २० नुसार, निशाणी १४ अन्वये तसेच वृत्तपत्रातुन जाहीरातीव्दारे (निशाणी १९) नुसार दावा समन्सची बजावणी करण्यात आली. परंतु ते दोघेही न्यायालयासमक्ष हजर

झाले नाही. त्यामुळे निशाणी १ वरील अनुक्रमे दिनांक २५/०१/२०१२ व दिनांक ०५/०२/२०१३ रोजीचे आदेशानुसार त्यांचेविरुध्द प्रकरण एकतर्फी चालविण्यात आले.

५. वादीतर्फे केवळ एकाच साक्षीदाराची साक्ष घेण्यात आली आहे. तो म्हणजे वादीतर्फे मुखत्यार प्रदीप खरे निशाणी २१ नुसार.

६. या तोंडीपुराव्या व्यतिरिक्त वादीतर्फे, जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा धोडप चे मुख्याध्यापकांनी दिलेला दाखला निशाणी २६, पोलीस पाटील धोडप यांनी दिलेला वंशावळ दाखला निशाणी २७, सरपंच, ग्रामपंचायत धोडप यांनी दिलेले वारसाचे प्रमाणपत्र निशाणी २८, पोलीस पाटील धोडप यांनी दिलेले वारसाचे प्रमाणपत्र निशाणी २९ इ. कागदपत्रांवर भर दिला आहे. तसेच दावा दाखल करतांना यादी निशाणी ३ नुसार वाद मिळकतीचा ७/१२ उतारा, तसेच नमुना ८अ ची प्रमाणित नक्कल प्रकरणात दाखल केली आहे. अभिलेखावरुन असे दिसते की, सदर कागदपत्रांना निशाणी देण्याचे राहून गेले. त्यामुळे न्यायनिवाडयाच्या वेळेस त्यांना अनुक्रमे निशाणी ३२ व ३३ देण्यात येत आहे.

७. निशाणी ३० नुसार सुचना पत्र देउन वादीतर्फे इतर कोणचीही साक्ष दयावयाची नसल्याचे कळविण्यात आले आहे.

८. वादीतर्फे श्री.आर.डब्ल्यू.बडगे, वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

९. निणर्यासाठी पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थितीत होतात. त्यावरील निर्णय त्याखालील कारणांसह नमुद करण्यात येत आहे ते येणेप्रमाणेः-

| <u>मुद्दे.</u> | <u>निष्कर्ष.</u> |
|---|---|
| १. वादी हे सिध्द करते काय की, वाद मिळकतीत तिचा १/३ हिस्सा आहे ? | 'होकारार्थी'. |
| २. वादी विनंतीप्रमाणे वाटणी व स्वतंत्र ताब्याची दाद मिळण्यास पात्र आहे काय ? | 'होकारार्थी'. |
| ३. आदेश व हुकूमनामा ? | 'अंतिम आदेशाप्रमाणे'. |

**<u>-कारणमिमांसा-</u>**

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीताः</u>**-

१०. वादीचा मुखत्यार प्रदीप (वादी सा.क्र.१) याने दाव्यातील मजकुराला अनुसरुन निशाणी २१ नुसार साक्ष दिली आहे. वादी मयत धनसिंग मांडवे यांची मुलगी असल्याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेले प्रमाणपत्र निशाणी २६, तसेच पोलीस पाटील व सरपंच यांनी दिलेले दाखले अनुक्रमे निशाणी २७ ते २९ प्रकरणात दाखल केले आहेत.

११. उलटतपासा अभावी या बाबतची त्याची साक्ष ना हरकत राहीली आहे. त्यामुळे वादी ही मयत धनसिंग बुढया मांडवे याची मुलगी व प्रतिवादी क्र.१ तिची सावत्री आई व प्रतिवादी क्र.२ तिचा सावत्र भाउ असल्याचे सिध्द होते.

१२. वादीच्या कथनानुसार वाद मिळकत ही मयत धनसिंग याची स्वकष्टार्जित मिळकत होती. वादीचे सदर कथन कोठेही अव्हानित करण्यात आलेले नाही. ७/१२ उतारा निशाणी ३२ वरुन देखील सदर बाब अधोरेखित होते. सबब वाद मिळकत ही मयत धनसिंग याची स्वकष्टार्जित मिळकत होती ही बाब वादीने सिध्द केली आहे.

१३. त्यामुळे हिंदु वारसा हक्क अधिनियम, १९५६ चे कलम ८ नुसार वादी, प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ यांचा वाद मिळकतीत प्रत्येकी १/३ हिस्सा आहे. पर्यायाने, वादीचा हिस्सा वेगळा करुन त्याचा स्वतंत्र ताबा मिळण्याची दाद मिळण्यास वादी पात्र ठरते. करीता मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर **'होकारार्थी'** असे दिले आहे.

१४. वरील मुद्दे क्र.१ व २ च्या निर्णयाला अनुसरुन पुढील प्रमाणे आदेश करण्यांत येत आहे.

**आदेश**

१. दावा खर्चासह मंजुर करण्यांत येत आहे.

२. वादी, प्रतिवादी क १ व प्रतिवादी क.२ यांचा वाद मिळकतीत प्रत्येकी १/३ हिस्सा असल्याचे याव्दारे ठरविण्यात येत आहे.

३. वाद मिळकतीतील वादीचा १/३ हिस्सा सरस-निरस वाटणी करुन तिच्या स्वतंत्र ताब्यात देण्यात यावा.

४. येणे प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

५. न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात उद्घोषित करुन त्यावर सही केली.

स्वा/-.
(शे.रा.तोतला)
सह-दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चिखली.

दिनांकः-२८/१०/२०१३.